# २४. आपले कपडे



## सांगा पाहू







| १ | | २ | | ३ | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वरील चित्रे काळजीपूर्वक पाहा. ही चित्रे कोणकोणत्या दिवसांतील आहेत ते चौकटींत लिहा.

१. पहिल्या चित्रात लोकांनी कशा प्रकारचे कपडे वापरले आहेत ?

२. त्यांनी असे कपडे वापरण्याचे कारण काय ?

३. दुसऱ्या चित्रात लोकांनी कोणत्या प्रकारचे कपडे घातलेले दिसतात ?

४. रेनकोट व छत्रीचा वापर लोक कोणत्या दिवसांत करताना दिसत आहेत ?

५. तुमच्या परिसरात वेगवेगळ्या दिवसांत वापरल्या जाणाऱ्या कपड्यांची यादी करा.

- वेगवेगळ्या दिवसांमध्ये कपड्यांमध्ये असे बदल का झालेले आहेत?
- कारण त्या दिवसांमध्ये तिथल्या हवेत बदल झालेले आहेत.
- या बदलांपासून शरीराचे संरक्षण होण्यासाठी आपल्याला कपड्यांची गरज असते.



## माहीत आहे का तुम्हांला ?

- हवेतील अशा बदलांमुळे वर्षाचे तीन मुख्य भाग पडतात. त्यांना **ऋतू** म्हणतात.
- ते ऋतू म्हणजे • **उन्हाळा** • **पावसाळा** • **हिवाळा.**
- प्रत्येक ऋतू साधारणपणे चार महिन्यांचा असतो.
- ऋतू एकामागून एक सतत येत असतात, याला **ऋतुचक्र** म्हणतात.
- ऋतूनुसार निसर्गात व परिसरात बदल होतात.





## हे नेहमी लक्षात ठेवा

माणसाच्या व इतर सजीवांच्या जीवनावर ऋतूंचा मोठा परिणाम होतो. प्रत्येक ऋतूनुसार आपण वेगवेगळे कपडे घालतो आणि आहारात बदल करतो. शेती व इतर व्यवसायांवरही ऋतूंचा परिणाम होतो. निसर्गात ऋतूनुसार अनेक बदल होत असतात. माणसाने या बदलांशी जुळवून घेणे चांगले.



## जरा डोके चालवा

- उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतू कोणकोणत्या महिन्यांत येतात?
- हिवाळ्यात थंडीपासून संरक्षण व्हावे म्हणून आपण उबदार कपडे घालतो. उन्हाळ्यात असे उबदार कपडे घातले, तर काय होईल ?
- प्राणी कपडे घालत नाहीत. मग थंडीपासून त्यांचे संरक्षण कसे होते ?
- हिवाळ्यात अनेक झाडांची पाने गळतात. या झाडांना पुन्हा पाने कधी येतात?



## करून पहा

१. आसपासच्या लोकांनी घातलेले कपडे पहा.
२. त्यांच्या कपड्यांतील फरक खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.
(१) रंग (२) प्रकार (३) व्यवसायानुसार गणवेश.







### ● कपड्यांची विविधता

- आपला देश फार मोठा असल्यामुळे लोकांच्या कपड्यांत प्रदेशांनुसार विविधता आढळते.
- पुरुष शर्ट-पँटशिवाय धोतर-सदरा, पायजमा, लुंगी हे कपडे वापरताना दिसतात. तसेच टोपी, मुंडासे, फेटा, पगडी वापरतात.

• स्त्रिया व मुली साडी, सलवार-कमीज, फ्रॉक व पँट-शर्ट सुद्‌धा वापरतात.



• सण, उत्सव आणि समारंभात लोक नटूनथटून जातात. काही लोक पारंपरिक पोशाख घालतात. उठून दिसणारे भरजरी कपडे घालतात. लोक वेगवेगळ्या रंगांचे, वेगवेगळ्या प्रकारांचे व वेगवेगळ्या नक्षीचे कपडे घालतात, हे तुमच्या लक्षात आले असेल. यालाच कपड्यांतील विविधता म्हणतात. प्रामुख्याने ऋतूनुसार कोणते कपडे घालायचे ते ठरते, परंतु आवड, सोय व व्यवसाय यावरूनही कोणते कपडे घालायचे हे ठरते. तसेच वेगवेगळ्या परंपरेनुसारसुद्‌धा कपड्यांमधील विविधता आढळते.



तुम्ही शाळेत जाता तेव्हा गणवेश घालता. सगळ्या विद्यार्थ्यांनी एकाच प्रकारचा गणवेश घातल्यामुळे तुम्ही शाळेत एकसारखे दिसता. तुम्हांला एक वेगळी ओळख मिळते. अशाच प्रकारे काही व्यवसायांमध्ये गणवेश घातले जातात. अशा विविध व्यवसायांची माहिती घ्या.



**मी कोण?**

१. पांढरा कोट घालून मी लोकांना तपासतो.

[ ]

२. मी निळे कपडे घालतो, आग लागली की ती विझवतो.

[ ]

३. खाकी कपडे घालून मी तुम्हांला नेहमी दिसतो. भांडणतंटे झाले, तर मी तिथे पोहचतो.

[ ]

४. मी रुग्णालयात असते आणि रुग्णांची काळजी घेते.

[ ]

५. मी देशाच्या संरक्षणास सदैव तत्पर असतो.

[ ]







## जरा डोके चालवा

१. कमलला मामाकडे चालत जायचे आहे पण खूप पाऊस आला आहे. न भिजता मामाकडे जाण्यासाठी तिला काय करावे लागेल?

२. जेकबने लोकरीचे कपडे घातले आहेत परंतु त्याला खूप गरम होत आहे. त्याने कोणते कपडे घालणे योग्य होईल?



## काय करावे बरे ?

मनजित आणि सानिया यांची थंड हवेच्या ठिकाणी सहल जाणार आहे. तिथे वापरण्यासाठी त्यांनी खालीलपैकी काय-काय सोबत घ्यावे असे तुम्हांला वाटते ?
तुम्ही निवडलेल्या चित्रांखालील चौकटींत ✓अशी खूण करा.

















## माहीत आहे का तुम्हांला ?

सैनिकांचे गणवेश नैसर्गिक परिस्थितीशी मिळतेजुळते असतात. शत्रूच्या सैन्याला सहजपणे लक्षात येऊ नये म्हणून अशी युक्ती केलेली असते. उदा., वाळवंटी प्रदेशात खाकी कपडे, जंगली प्रदेशात हिरवे, तर हिमालयासारख्या बर्फाळ प्रदेशात पांढरे कपडे वापरतात.



## आपण काय शिकलो

* ऋतुमानानुसार कपड्यांमध्ये बदल करावे लागतात.
* आवड, व्यवसाय व परंपरेनुसारही कपड्यांमध्ये विविधता आढळते.



## स्वाध्याय

### (अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) तुम्ही एका वर्षात कोणकोणते ऋतू अनुभवता?
(२) ऋतूंनुसार कपड्यांमध्ये बदल का करावा लागतो ?
(३) गणवेश घालावा लागतो अशा तीन व्यवसायांची नावे लिहा.
(पाठात न दिलेल्या व्यवसायांचीच नावे द्या.)
(४) तुमच्या परिसरातील काही पारंपरिक कपड्यांची नावे लिहा.

### उपक्रम

कपड्याच्या दुकानास/प्रदर्शनास भेट द्या. त्यांमधील तुम्हांला आवडलेल्या कपड्यांची चित्रे रेखाटा. त्यांविषयी चार ओळींमध्ये माहिती लिहा.

***